पत्र क्र.वजिप/शिवि/खाप्राशा/वशि- ३९१ २०२१
कार्यालय,शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प.वर्धा
दिनांक :- ०९ / ०८ /२०२१

**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, आक्टोंबर ११,२०११ / आश्विन १९ शके १९३३**

**नमुना दोन**

ग्राम :- वर्धा

दुरध्वनी :- ०७१५२-२४३५९७

ई-मेल :- eopriwardha@gmail.com

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांचे कार्यालय, जिल्हा वर्धा महाराष्ट्र

जा.क्र.जिपव/प्राशिवि/खाप्राशा/वशि- ३९१ /२०२१ दिनांक ०९/०८/२०२१

व्यवस्थापक :- भारतीय विद्या भवन्स, नागपूर.

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

महोदय / महोदया,

आपल्या दिनांक **३०/०९/२०२०** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे.मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वर्धा **दिनांक ०१/०४/२०२०** पासून दिनांक **३१/०३/२०२३** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वी करीता (शाळेचे नाव पत्यासह ) **भवन्स लॉयडस विद्यानिकेतन, भुगाव, वर्धा** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे. वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे, शाळा पालन करील.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयतेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५) संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता - पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (एक). शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयतेत असेल त्याच इयतेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही

(दोन). कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन). कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार). प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच). विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा). अधिनियमाच्या कलम २३ (१) मध्ये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात). अधिनियमाच्या २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ). शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

SMT. A. SHASTRI
DIRECTOR
Bharatiya Vidya Bhavan
Civil Lines, Nagpur-1

Bhavan's Lloyds Vidya Niketan, Lloyds Nagar, WARDHA

PRINCIPAL,
Bhavan's Lloyds Vidya Niketan,
Lloyds Nagar, WARDHA.

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९) शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

| | | |
|---|---|---|
| • | शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | ४२१०० चौ.मी. |
| • | एकूण बांधकाम क्षेत्र | ३८५८.५२ चौ.मी. |
| • | खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | २४३५४.६० चौ.मी |
| • | वर्गखोल्यांची संख्या | २५ |
| • | कार्यालय, भांडार, मुख्याध्यापकाची खोली | ०५ |
| • | मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | प्रसाधनगृह १४<br>मुतारी २४ |
| • | पिण्याच्या पाण्याची सुविधा | वॉटर कुलर व नळ |
| • | दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | लागू नाही |
| • | अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता | आहे |
| • | वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. | आहे |

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल.

१३) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यात्रेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक २७०८०८०२२०३ असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी, किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल, अशा सूचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९) जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडलेल्या आहेत.

(संजय मेहेर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वर्धा

PRINCIPAL,
Bhavan's Lloyds Vidya Niketan,
Lloyds Nagar, WARDHA.

Bhavan's Lloyds Vidya Niketan
Lloyds Nagar, WARDHA

SMT. A. SHASTRI
DIRECTOR
Bharatiya Vidya Bhavan
Civil Lines, Nagpur-1